# कोव्हिड लसीविषयी जाणून घ्या!
# कोव्हिड लस जरूर घ्या!




## कोरोना विरोधी जन अभियान

साभार : डॉ. अनंत फडके, डॉ. विनीता बाळ,
संकलन व संपादन : मेधा काळे, किरण मोघे


कोव्हिड लसीकरण केंद्र

## कोव्हिड–लस जरूर घ्या!

कोरोना विषाणूमुळे पसरलेल्या म्हणजेच कोव्हिड–१९ च्या महासाथीने भारतासह अख्ख्या जगभरात मार्च २०१९ पासून थैमान घातलं आहे. एक वर्षाहून अधिक काळ आपण कोव्हिडचा मुकाबला करत आहोत. ३ जानेवारी रोजी केंद्र सरकारने दोन लशींना आपात्कालीन परिस्थितीसाठी मान्यता दिली. त्यातील एक लस म्हणजे ऑक्सफर्ड–ॲस्ट्राझेनेकानी शोधलेली आणि भारतात तयार करण्यात आलेली कोविशील्ड ही लस. तर दुसरी भारत बायोटेक आणि आयसीएमआर यांनी विकसित केलेली कोवॅक्सिन. या लशींना परवानगी देताना पुरेशी माहिती न मिळाल्यामुळे सुरुवातीला या लशींच्या, खास करून कोवॅक्सिनच्या परिणामकारकतेबद्दल अनेकांच्या मनात शंका होती. मात्र आता ही लस देखील परिणामकारक आहे असा प्राथमिक पुरावा हाती आला आहे. भारतात नोंदल्या गेलेल्या दर १००० कोव्हिड–१९ रुग्णांच्या पैकी १४ जण (म्हणजे १.४%) मृत्यूमुखी पडत आहेत. (भारतात आतापर्यंत जवळ जवळ १.१५ कोटी रुग्ण नोंदले गेले आहेत आणि त्यापैकी जवळ जवळ १.६ लाख दगावले आहेत.)

४५ वर्षे पूर्ण झालेल्या सर्वांनी आणि ४५ ते ६० वयोगटातील ब्लड–प्रेशर, मधुमेह, लठ्ठपणा, हृदयविकार, दमा इ पैकी आजार असतील त्यांना प्राधान्याने लस देण्याचे सरकारने ठरवले आहे. कारण त्यांना कोव्हिड–१९ ने गंभीर आजार होण्याचा व मृत्यू होण्याचा धोका जास्त असतो. त्यांनी ही लस जरूर घ्यायला हवी.

## लस घेण्याच्या विरोधात जे आक्षेप घेतले जातात त्यांचा थोडक्यात विचार करू –

**“आमच्या भागात कोरोना गेला आहे; अनेक जण मास्क न घालता बिनधास्त वावरतात, त्यांना काहीही झालेलं नाही. मला गेल्या वर्षभरात कोरोना झालेला नाही, मला होणार नाही.”**

- खरी परिस्थिती अशी आहे की आता कोरोना गेला असे म्हणता म्हणता अनेक ठिकाणी कोव्हिड–१९ च्या केसेस वाढल्या आहेत. पुणे जिल्ह्यात सप्टेंबर २०२० मध्ये दिवसाला तब्बल ४,००० केसेस होत्या. त्या जानेवारी २०२१ अखेर ५०० पर्यंत खाली आल्या. पण मार्च मध्ये वाढत जाऊन सध्या दिवसाला ३,००० हून अधिक केसेस होऊ लागल्या आहेत! ज्या वस्त्यांमध्ये

केसेस व्हायच्या बंद झाल्या होत्या तिथेही नवे रुग्ण आढळू लागले आहेत. हे सर्व जण ज्यांना गेल्या वर्षभरात कोरोना झालेला नाही असेच आहेत! म्हणजे एक वर्ष कोरोना झाला नाही म्हणून आताही होणार नाही हा भ्रम आहे.

**"ही लस बोगस आहे, तिचा काही उपयोग नाही, ही लस घेतलेल्यांनाही कोरोना झाला आहे. लस करणाऱ्या कंपन्यांचा फक्त फायदा."**

- खरी परिस्थिती अशी आहे की दोन डोस झाल्यावर दहा दिवसांनी पूर्ण प्रतिकार शक्ती येते. ही कोरोना झाल्याची जी उदाहरणं दिली जातात त्यात दोन डोस घेतलेले फारसे कोणी नाही! दुसरं म्हणजे **कोणतीच लस १००% संरक्षण देत नाही.** मात्र या लसीच्या अभ्यासात दिसलं आहे की लसीचे दोन डोस पूर्ण केल्यावर अगदी क्वचित कोणाला कोव्हिड-१९ चा आजार झाला आहे. झाला तरी तो सौम्य असतो. सहसा तीव्र आजार होत नाही आणि कोणीही कोव्हिड-१९ ने दगावत नाही. रेनकोट किंवा छत्रीने आपले पावसापासून पूर्ण संरक्षण होत नाही. पण ओलेचिंब होण्यापासून आपण वाचतो. तसंच हे आहे.

**"ही लस पूर्णपणे परिणामकारक, सुरक्षित आहे का? अनेक तज्ज्ञांनीही सरकारवर या लसी बाबत टीका केली ती उगाच का?"**

- या लशींना भारतात ३ जानेवारीला परवानगी देताना सरकारने पूर्ण सत्य पारदर्शीपणे लोकांपुढे मांडलं नाही. त्यामुळे अनेक तज्ज्ञ, आणि आरोग्य-कार्यकर्त्यांनी त्याबाबत योग्य टीका केली होती. दुसरं म्हणजे ही लस नवीन असल्याने लस दिल्यावर किती प्रमाणात, कोणते दुष्परिणाम होतात, याकडे शासन कसं विशेष लक्ष देत आहे या बाबतही सरकारने नीट माहिती न दिल्याने गैरसमज वाढले. पण आपण एक लक्षात घेतलं पाहिजे की कोव्हिड-१९ आजाराचा धोका अजून फार मोठा आहे. साथ ओसरायला २०२२ उजाडावे लागेल व तोपर्यंत लस न घेणाऱ्यांपैकी हजारो लोक या आजाराने दगावतील.

- दुसरं म्हणजे जगात ठिकठिकाणी या कोव्हिड-१९ लशीबाबत खूप अभ्यास झाला आहे. कोवॅक्सिन या भारतात संशोधन आणि निर्मिती झालेल्या लसीबद्दल सुद्धा मार्चच्या सुरुवातीला हाती आलेल्या प्राथमिक विश्लेषणातून ती ८० टक्के परिणामकारक आहे असं दिसून येत आहे. निरनिराळ्या देशात कोट्यवधी लोकांनी लस घेतली आहे, भारतातही चार कोटीपेक्षा जास्त लोकांनी ही लस घेतली आहे. त्या मानाने गंभीर दुष्परिणाम झाल्याचे प्रमाण अत्यल्प आहे असे दिसते आहे.

- या सर्वांचा एकत्रित विचार केला तर स्पष्ट आहे की कोव्हिड-१९ लस घेतल्याने हजारो जीव वाचतील आणि लाखो लोकांचा गंभीर आजार टळेल. प्रत्येकाने आपापला विचार केला तरी एकंदरीत लस न घेण्यापेक्षा लस घेण्याने आपली सुरक्षितता शेकडोपट वाढते. कोणत्याही औषधाचे काही ना काही दुष्परिणाम होतात; काही औषधांनी अगदी क्वचित जीव धोक्यातही येऊ शकतो. तरीसुद्धा गरज असेल तर आपण औषध घेतोच, दुष्परिणाम होतील म्हणून औषध घ्यायला नकार देत नाही. तसेच या लसीबाबतही आहे - या महा-साथीमुळे होणारा मोठा धोका पाहता ही लस घ्यायला हवी.

**''कोणती लस घ्यायची हे ठरवण्याचा अधिकार मला नाही तर मी लसीबाबत योग्य निर्णय कसा घेणार आणि सध्या मला कोणती लस दिली जात आहे हे मला कसं कळणार?''**

- सध्या सरकारी आणि खाजगी केंद्रांमध्ये काही ठिकाणी कोविशिल्ड उपलब्ध आहे आणि काही सेंटरमध्ये कोवॅक्सिन आहे. पण दोन्ही लसी सुरक्षित आहेत त्यामुळे लसीकरण केंद्रामध्ये जी लस उपलब्ध आहे ती घ्यावी.

**''मला समजा ब्लड-प्रेशर, मधुमेह, हृदयविकार असेल किंवा दमा किंवा असा काही आजार असेल तर लस घेणे धोक्याचे आहे. नाही का?''**

- नाही. उलट असे आजार असलेल्या लोकांना कोव्हिड-१९ चा जास्त धोका निश्चितच जास्त आहे. आतापर्यंतच्या संशोधनात तरी अशा लोकांना या लसीचा काही खास धोका आहे असे आढळलेले नाही. लाखामागे एकाला लसीची तीव्र रिॲक्शन येऊ शकते. असे झालेच तर लगेच उपचार करता यावे म्हणून ही लस देतांना डॉक्टर हजर असतात व तीव्र रिॲक्शन आलीच तर लगेच इंजेक्शन इत्यादी उपचार करण्याची तयारी केलेली असते. म्हणूनच ही लस साध्या दवाखान्यात नाही तर सरकारमान्य, सुसज्ज हॉस्पिटल मध्ये दिली जाते.

**''लस घेतल्यावर काही लोकांना काही बाही त्रास होतो असे ऐकले आहे. असे झाले तर काय करायचे?''**

- लहान मुलांना लसी दिल्यावर ज्या प्रकारे थोडाफार त्रास होतो तसाच प्रकार कोव्हिड-लसी बाबत आहे. -

- कोविड-१९ ची लस घेतल्यावर अनेकांना इंजेक्शनची जागा थोडी दुखणं, थोडी अंगदुखी, डोकेदुखी, बारीक ताप अशा प्रकारे त्रास होऊ शकतो. गरज वाटली तर पॅरासिटॅमॉलची (क्रोसिन इ.) एक-दीड गोळी गरजे प्रमाणे दिवसातून दोन-तीन वेळा घ्यायला हरकत नाही.

- थकवा वाटल्यास विश्रांती घ्या.
- काही जणांना दुसऱ्या दिवशी अचानक थंडी वाजून ताप येऊ शकतो. असे झाले तर अजिबात घाबरू नका. ताप येऊ लागला की लगेच पॅरासिटॅमॉलची (क्रोसिन इ.) दीड गोळी घ्या, विश्रांती घ्या, बाकी काही करायची गरज नाही.
- मळमळ-उलटी, पोटदुखी, अंगावर पुरळ असेही होऊ शकते. पण घाबरू नका, त्याने कोणताही गंभीर धोका नाही. गरज वाटल्यास सरकारी डॉक्टरशी संपर्क करा.
- ज्यांना उच्च रक्तदाबाचा त्रास आहे त्यांनी लस घेण्याच्या आधी आणि लस घेतल्यानंतर अर्ध्या तासांनी आपला रक्तदाब तपासून घ्यावा कारण लस घेतल्यावर अगदी क्वचित प्रसंगी रक्तदाब तात्पुरता वाढू शकतो.

**"लस घेतल्यावर कोव्हिड-१९ आजार न होण्याची गॅरंटी नाही, मास्क लावणे बंद करायचे नाही मग कशासाठी लस घ्यायची ? "**

- कोव्हिड-१९ आजार न होण्याची गॅरंटी नसली यशस्वी लसीकरण झाल्यावर कोव्हिड-१९ ने मृत्यू येणार नाही याची गॅरंटी आहे; तसंच तीव्र आजार होण्याची शक्यताही खूपच कमी आहे. घराबाहेर जाताना मास्कचा वापर चालू ठेवावा लागेल कारण कोव्हिडचे विषाणू आपल्या श्वासमार्गात शिरून, त्यांची पिलावळ शरीरात वाढून ती आपल्या श्वासातून बाहेर पडण्याची थोडी शक्यता राहतेच; आजार होत नाही एवढेच. त्यामुळे मास्क नाही घातला तर आपल्यापासून इतरांना लागण होऊ शकते. तसंच इतरांपासून आपल्यालाही क्वचित लागण होऊ शकते. हे टाळण्यासाठी मुख्यतः मास्कचा योग्य वापर, एकमेकांपासून ६ फूट अंतर ही पथ्यं साथ संपेपर्यंत चालू ठेवावी लागतील.

**"लस घेण्याआधी काही पथ्ये पाळायची का ? सोबत काय-काय न्यायचं ?"**

- लस घ्यायला शक्यतो भरल्यापोटी जावे. उपाशी पोटी जाऊ नये. लसीकरण केंद्रावर कमी जास्त वेळ लागू शकतो. त्यामुळे पाण्याची बाटली, कोरडा खाऊ, बिस्किटे, सरबत इत्यादी घेवून जावे.
- जातांना सोबत आपले आधारकार्ड व पॅनकार्ड घेवून जावे. जे लोक ४५ ते ५९ या वयोगटात आहेत आणि ज्यांना मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, किडनीचे आजार, कॅन्सर, दमा असे इतर आजार आहेत त्यांनी त्याबाबतचे डॉक्टरचे सर्टिफिकेट सोबत न्यायचे आहे. त्या शिवाय त्यांना लस मिळणार नाही.
- ज्यांना मधुमेह, उच्च रक्तदाब, आहे त्यांनी ते नियंत्रणात आहेत याची खात्री करावी आणि त्याच्या गोळ्या घेऊनच लस घ्यायला जावे.

**"शाळा कॉलेज सुरू झाल्यावर मुलं लोकांच्या सर्वात जास्त संपर्कात येणार आहेत. मग त्यांना ही लस कधी मिळणार?"**

- सध्या लसीकरण कार्यक्रम केवळ ४५ वर्षे वयापुढील लोकांसाठी सुरू आहे. नंतर सर्वांसाठी लसीकरण सुरू झाले तरी १६ वर्षाखालील मुलांना लस देवु नये. १६ वर्षांखालील मुलांवरती या लशीचे अभ्यास सुरू आहेत. त्याचे निष्कर्ष सकारात्मक आले की मुलांनाही ही लस देता येईल.

**"कोव्हिड १९ ची लागण झाल्यानंतर लस घेता येते का?"**

- होय, आजार बरा झाल्यावर ६ ते ८ आठवड्यानंतर लस घेता येते.

**लसीकरणासाठी नोंदणी कशी करायची?**

- कोविड लसीकरणासाठी नोंदणी करण्यासाठी आरोग्य सेतू, Co-Win APP किंवा cowin.gov.in या पोर्टलचा वापर करता येऊ शकेल.
- पोर्टलवर गेल्यावर रजिस्टर करा.
- आपला मोबाइल नंबर टाइप करा.
- खाते तयार करण्यासाठी तुम्ही टाइप केलेल्या नंबरवर ओटीपी येईल, तो घाला.
- आपले नाव, जन्मवर्ष, ओळखपत्र (आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन परवाना, पासपोर्ट, इत्यादी) क्रमांक घाला.
- इतर काही आजार (मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार, किडनीचे आजार, कॅन्सर, दमा, इत्यादी) आहे का याची माहिती भरा.
- त्यानंतर आपल्या भागाचा पिन कोड टाइप करा आणि सर्च करा.
- त्या भागातील लसीकरण केंद्रांची नावे येतील. त्यावर क्लिक केल्यानंतर तुम्हाला उपलब्ध तारीख आणि वेळ दिसेल. त्यावर क्लिक करून आपली वेळ निश्चित करा.
- आपली वेळ निश्चित झाल्याचा मेसेज तुमच्या फोनवर येईल.
- तुम्हाला मिळालेल्या वेळी आपले ओळखपत्र घेऊन जा. ज्या ओळखपत्राचा क्रमांक घातला आहे तेच सोबत न्या.
- आपण ४५-५९ वयोगटात असाल तर तुम्हाला इतर आजार असल्याचे डॉक्टरांचे प्रमाणपत्र सोबत न्यावे लागेल. **त्याचा नमुना मागे दिला आहे.**
- काही केंद्रांवर सकाळी लवकर जाऊन नाव नोंदवावे लागते.

**Annexure 1(B): Certificate to identify individuals with co-morbidities that enhance the risk of mortality in COVID-19 disease for priority vaccination**
**(To be filled by a Registered Medical Practitioner)**

Name of beneficiary:

Age: Gender:

Address:

Mobile phone number:

Identification document:

I, Dr. ________________________________, working as ___________________________ have reviewed the above named individual and certify that he/she has the below mentioned conditions based on the records presented to me. A copy of the records on which this certificate is based is attached.

Presence of ANY ONE of the following criteria will prioritize the individual for vaccination

| SN | Criterion | Yes/No |
|---|---|---|
| 1. | Heart Failure with hospital admission in past one year | |
| 2. | Post Cardiac Transplant/Left Ventricular Assist Device (LVAD) | |
| 3. | Significant Left ventricular systolic dysfunction (LVEF <40%) | |
| 4. | Moderate or Severe Valvular Heart Disease | |
| 5. | Congenital heart disease with severe PAH or Idiopathic PAH | |
| 6. | Coronary Artery Disease with past CABG/PTCA/MI AND Hypertension/Diabetes on treatment | |
| 7. | AnginaAND Hypertension/Diabetes on treatment | |
| 8. | CT/MRI documented stroke AND Hypertension/Diabetes on treatment | |
| 9. | Pulmonary artery hypertension AND Hypertension/Diabetes on treatment | |
| 10. | Diabetes (> 10 yearsORwith complications) AND Hypertension on treatment | |
| 11. | Kidney/ Liver/ Hematopoietic stem cell transplant: Recipient/On wait-list | |
| 12. | End Stage Kidney Disease on haemodialysis/ CAPD | |
| 13. | Current prolonged use of oral corticosteroids/ immunosuppressant medications | |
| 14. | Decompensated cirrhosis | |
| 15. | Severe respiratory disease with hospitalizations in last two years/FEV1 <50% | |
| 16. | Lymphoma/ Leukaemia/ Myeloma | |
| 17. | Diagnosis of any solid cancer on or after 1st July 2020 Orcurrently on any cancer therapy | |
| 18. | Sickle Cell Disease/ Bone marrow failure/ Aplastic Anemia/ Thalassemia Major | |
| 19. | Primary Immunodeficiency Diseases/ HIV infection | |
| 20. | Persons with disabilities due to Intellectual disabilities/ Muscular Dystrophy/ Acid attack with involvement of respiratory system/ Persons with disabilities having high support needs/ Multiple disabilities including deaf-blindness | |

I am aware that providing false information is an offence.

Name of RMP:__________________

Medical Council registration number of RMP: ____________

Date of issuing the certificate: ____________

Place of issue: _________________. (Signature of RMP)

https://www.mohfw.gov.in/covid_vaccination/vaccination/dist/downloads/certificate-to-identify-individuals-with-co-morbidities-that-enhance-the-risk-of-mortality-in-covid-19-disease-for-priority-vaccination.pdf

## लसीकरणापूर्वी तुम्हाला असलेल्या आजारांची माहिती द्या.

**आपल्याला खालील काही आजार असतील तर आपल्या डॉक्टरांच्या सल्ल्याने लसीकरण करा. तसंच लसीकरण केंद्रावर गेल्यावर तिथल्या डॉक्टरांनाही आपल्याला काही त्रास होत असेल तर ते प्रामाणिकपणे सांगा.**

**जर,**

- तुम्हाला यापूर्वी तीव्र ॲलर्जीचा त्रास होऊन गेला असेल
- सर्दी-खोकला, श्वासाचे आजार असतील, सध्या त्रास होत असेल तर
- रक्तस्राव होण्याचा आजार असेल,
- प्रतिकार शक्ती खालावली आहे,
- तुम्ही गरोदर असाल किंवा येत्या काळात गरोदर राहण्याचा विचार करत असाल
- तुम्ही बाळाला अंगावर पाजत असाल

**तर, तुम्ही लस घ्यायला हरकत नाही. मात्र तशी माहिती लसीकरण केंद्रातल्या डॉक्टरांना अवश्य द्या.**

## कोविड लसीकरण केंद्रांची यादी

**खालील हॉस्पिटलमध्ये आठवड्यातील ७ दिवस २४ तास लसीकरण सुरू राहील.**

१. कमला नेहरू हॉस्पिटल, मंगळवार पेठ
२. भारतरत्न स्वर्गीय राजीव गाधी हॉस्पिटल, येरवडा
३. कै. जयाबाई नानासाहेब सुतार हॉस्पिटल, कोथरूड
४. कै. मुरलीधर पांडुरंग लायगुडे हॉस्पिटल, वडगाव धायरी
५. कै. अण्णासाहेब मगर हॉस्पिटल, हडपसर

**खालील सरकारी दवाखान्यात सोमवार ते शनिवार स ९ ते सं. ५ वाजेपर्यंत लसीकरण केले जाईल. लस सर्वांना मोफत दिली जाते. सोबत गोळ्याही दिल्या जातात.**

गंगाराम कर्णे दवाखाना, नगर रोड

कळस दवाखाना, येरवडा

मालती काची प्रसूतिगृह, भवानी पेठ

बाबासाहेब आंबेडकर दवाखाना, डायस प्लॉट

बिंधुमाधव ठाकरे दवाखाना, वारजे

बारटक्के दवाखाना, वारजे

भानगिरे दवाखाना, मोहम्मदवाडी

पोटे दवाखाना, सहकारनगर

मीनाताई ठाकरे पॉलिक्लिनिक, वडगाव शेरी

सावित्रीबाई फुले दवाखाना, गुरुवार पेठ

चंदुमामा सोनवणे हॉस्पिटल, काशेवाडी

कलावती मावळे दवाखाना, नारायण पेठ

रमाबाई आंबेडकर दवाखाना, आंबिल ओढा

मुरलीधर लायगुडे दवाखाना, वडगाव धायरी

प्रेमचंद ओसवाल दवाखाना, बिबवेवाडी

पृथक बराटे दवाखाना, वारजे

जनता वसाहत हॉस्पिटल, जनता वसाहत

विलासराव तांबे दवाखाना, धनकवडी

रमाबाई थोरवे दवाखाना,

थरकुडे हॉस्पिटल, एरंडवणे

नामदेवराव शिवरकर हॉस्पिटल

छत्रपती शाहू महाराज हॉस्पिटल,

सखाराम कोद्रे दवाखाना, मुंढवा

सावित्रीबाई फुले हॉस्पिटल, कोंढवा

साईनगर हॉस्पिटल,

धनकवडे हॉस्पिटल, बालाजीनगर

वसंत मोरे हॉस्पिटल, सुखसागरनगर

युगपुरुष छत्रपती हॉस्पिटल, व्हीआयटी

मुरलीधर लायगुडे दवाखाना, सिंहगड रोड

शेवाळे हॉस्पिटल, औंध

इंदुमती मणिलाल खन्ना, स्वारगेट

छत्रपती शिवराय हॉस्पिटल, येरववडा



**पुढील खाजगी दवाखान्यांमध्येही स. ९ ते संध्या. ५ वाजेपर्यंत लसीकरण सुरू आहे. इथे लसीसाठी रु. २५०/- इतकं शुल्क आकारलं जातं.**

| | |
|---|---|
| इनलॅक्स बुधरानी, कोरेगाव पार्क | श्री हॉस्पिटल क्रिटिकेअर, खराडी |
| एम्स, औंध | भारती हॉस्पिटल, कात्रज |
| साईश्री हॉस्पिटल, औंध | अपोलो स्पेक्ट्रा हॉस्पिटल्स, सदाशिव पेठ |
| कृष्णा हॉस्पिटल, कोथरुड | विनोद मेमोरियल मल्टिस्पेशालिटी, विश्रांतवाडी. |
| राव हॉस्पिटल, बिबवेवाडी | संजीवन हॉस्पिटल, एरंडवणे |
| शिवम मल्टि स्पेशालिटी, फुरसुंगी | ग्लोबल हॉस्पिटल, दत्तवाडी |
| गॅलक्सी केअर मल्टि स्पेशालिटी, कर्वे रोड | जहांगीर हॉस्पिटल, पुणे स्टेशन |
| पवार मल्टिस्पेशालिटी | शाश्वत हॉस्पिटल, डहाणूकर कॉलनी |
| रांका हॉस्पिटल, मुकुंदनगर | एन एम वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ कार्डिऑलॉजी, पुणे स्टेशन |
| सूर्या सह्याद्री, शनिवार वाडा | कोटबागी कोविड हॉस्पिटल, औंध |
| रायझिंग मेडिकेअर, खराडी | केईएम हॉस्पिटल, रास्ता पेठ |
| रुबी हॉल, पुणे स्टेशन | पूना हॉस्पिटल, डेक्कन कॉर्नर |
| देवयानी मल्टिस्पेशालिटी, डहाणूकर कॉलनी | साने गुरुजी आरोग्य केंद्र, मगरपट्टा |
| शाश्वत हॉस्पिटल | सह्याद्री सुपर स्पेशालिटी, कर्वे रोड |
| नोबल हॉस्पिटल, हडपसर | सह्याद्री सुपर स्पेशालिटी, नगर रोडी |
| ऑइस्टर अँड पर्ल, शिवाजीनगर | सह्याद्री हॉस्पिटल, हडपसर |
| मेडिपॉइंट, खराडी | ज्युपिटर हॉस्पिटल, बाणेर |
| दीनदयाळ मेमोरियल, शिवाजी नगर | संजीवनी हॉस्पिटल, उत्तम नगर |
| भारती आयुर्वेदिक हॉस्पिटल, धनकवडी | जोशी हॉस्पिटल, पुणे |
| रुबी हॉल, वानवडी | इनामदार हॉस्पिटल, फातिमा नगर |
| कोहकाडे हॉस्पिटल, चंदननगर | लोकमान्य हॉस्पिटल, गोखले नगर |

**साभारः पुणे महानगरपालिका आणि जिल्हा परिषद, पुणे**

आम्ही सर्व हे जाणतो की
कोरोना अजून गेलेला नाही.
आपल्याला अजूनही सावध
आणि सतर्क रहायचे आहे.
आम्ही सर्व नागरिक
अशी शपथ घेतो की,
आम्ही कायम आणि योग्य पद्धतीने
मास्कचा वापर करू,
एकमेकांपासून ६ फुटाचं अंतर ठेवू
प्रवासात, बाजारात, कामाच्या ठिकाणी गर्दी टाळू.
लक्षणे असल्यास ताबडतोब चाचणी
करून घेवू.

पुण्याचा निर्धार कोरोना हद्दपार
Pune Fights Corona
6 फूट

मुद्रणासाठी अर्थसहाय्य केल्याबद्दल मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रिज् ॲण्ड ॲग्रीकल्चर
यांचे मन:पुर्वक आभार.